प्रकरण - **13**

अर्थसहाय्य कार्यक्रमाची अंमलबजावणी

बाहयरुग्ण विभागासाठी वापरण्यात येणारा केस पेपरचे शुल्क रु.10 असून त्याची मुदत 15 दिवसांसाठी आहे. रुग्णालयात दाखल करण्यात येणा-या रुग्णांसाठी कोणतेही शुल्क आकारण्यात येत नाही.

सर्व बाहय व आंतर विभागातील रुग्णांसाठी औषधे व इंजेक्शनस मोफत देण्यात येतात.

मुलांना देण्यात येणारे सर्व प्रकारचे लसीकरण मोफत पुरविण्यात येते. प्रयोगशाळेतील सर्व तपासण्या मोफत केल्या जातात. क्ष किरण तपासणी करताना प्रत्येक फोटो साठी रु.30 आणि हृदयस्पंदनाभिलेखासाठी रु. 20 आकारण्यात येतात.

रुग्णालयामध्ये 'गरीब रुग्ण सहायतानिधी' उपलब्ध आहे. गरज पडल्यास अनुसुचित नसलेली, किंमती औषधे आंतर विभागातील रुग्णाना दिली जातात.

दारीद्रय रेषेखालील व गरजू रुग्णांना किंमती औषधासाठी आणि रुग्णांना या निधीतून दिली जातात. तसेच आंतर विभागातील रुग्णांच्या विशेष तपासण्या या निधीतून आर्थिक मदतीसाठी समाज विकास अधिका-याकडे पाठविले जाते. समाज विकास अधिकारी त्याची मुलाखत घेऊन त्याचा अभिप्राय नोंदवून प्रमुख वैद्यकिय अधिका-याकडे मजुरीसाठी पाठविणयात येतो. पूर्वमंजूरीनंतर समाजविकास अधिकारी आवश्यक ती मदत वेळोवेळी देतात.